शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 29 AUG 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],

जिल्हा परिषद पुणे.

विषय:- प्रथम मान्यता

आदिनाथ शक्ती विद्या. इंगळूण ता. जुन्नर

संदर्भ :- आपले पत्र जा. क्र. माध्य/शिक्षण/ह-४ १३-९४ दि. २८/३/९४.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३. अन्वये सह्याद्री विद्या विकास मंडळ, नारोडी, ता. जुन्नर संस्थेच्या मराठी माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९वी/१०वी च्या वर्गास सन १९ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९२ पासून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केल्या आहेत किंवा कसे याबाबी अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.

३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यासिशी उपलब्ध करुन द्यावी.

४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.

५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

६] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करुन द्यावा.

७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.

८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजुर करुनघ्यावेत.

९] शालेय रेकॉर्ड माध्य. शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात

१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.

११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.

१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.

१३] खेळासाठी क्रिडांगण आवश्यक

१४] विद्यार्थीसंख्या वाढवावी.

[illegible] शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत: मुख्याध्यापक,
आदिनाथ शक्ती विद्यालय, इंगळूण ता. जुन्नर.

आ. तारीख - ७/८/९३ (७५)

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/८-५/९३-९४

**BOOK-POST**

पुणे. दि. ३/८/९३

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~आदिमाता शक्ती विद्यालय इंगळूण~~
~~ता. जुन्नर जि. पुणे~~.

विषय :- नैसर्गिक वाढीने ~~इ. ९ वी, १० वी~~ वर्गास परवानगी व वार्षिक तपासणीबाबत.

आपल्या सह्याद्री विद्या विकास मंडळ संस्थेद्वारा संचलित इंगळूण येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी चे वर्ग [माध्यम मराठी/इंग्रजी] सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून शासन आदेश क्र. एस.एस.एन/१०९२/[२९४५]/माशि-५ दि. २८/८/९२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गाची सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे~~ /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांना या कार्यालयाकडून कळविणेत आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ च्या वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करून घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होऊन तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्याविषयी आपणास जबाबदार समजणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

(सही)

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"महाराष्ट्र शासन ..."
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
क्र. जिपशिक्षण/माध्य/८-४/२ ४-९५
पुणे. दि. ११/७/९४

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

माध्यमिक विद्यालय, इंगळूण

ता. जुन्नर जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने ~~८ वी~~, १० वी वर्गास परवानगी व वार्षिक तपासणीबाबत. ९४-९५

आपल्या सह्याद्री विद्या विकास मंडळ द्वारा संचालित इंगळूण येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी चे वर्ग [माध्यम मराठी/~~इंग्रजी~~] सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून शासन आदेश क्र. एस.एस.एन/३०९२/२७२३/माशि-३ दि. २६/५/९४ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~९ वी~~, इ. १० वी या वर्गाचे नैसर्गिक वाढीने सुरू होत असून सदर वर्गाची सन ९४-९५ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~शिक्षणाधिकारी~~, ~~जि. प. पुणे~~ /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांना या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील ~~९ वी~~, इ. १० वी च्या वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करून घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होऊन तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार समजण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

S.S.C बोर्डाचे फॉर्म
प्रथम भरून पाठवावेत

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद पुणे. करिता.